दिनांक १२/०८/२०२६.

'राष्ट्रीय ग्रंथपाल दिन'

पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक कॉलेज ग्रंथालय विभागामध्ये पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त १२ ऑगस्ट रोजी **राष्ट्रीय ग्रंथपाल दिन (National Librarian's Day)** साजरा केला. डॉ. एस. आर . रंगनाथन हे भारतातील ग्रंथालयशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जातात.



S. R. Ranganathan
"Father of Library Science in India"

डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे परिचय

* **जन्म:** १२ ऑगस्ट १८९२.

* **ओळख:** त्यांना भारतातील 'ग्रंथालयशास्त्राचे जनक' मानले जाते.

* **महत्त्वाचे कार्य:** त्यांनी ग्रंथालयशास्त्राचे मूलभूत 'पाच नियम' (Five Laws of Library Science) दिले, ज्यांनी जगभरातील ग्रंथालय व्यवस्थापनाची दिशा बदलली.

* **सन्मान:** त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी भारत सरकारतर्फे त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे महत्त्व

* ग्रंथपालांच्या कष्टांचा आणि त्यांच्या मोलाच्या कामाचा गौरव करणे.
* समाजात पुस्तके, वाचन संस्कृती आणि ज्ञानाचा प्रसार करणे.

आधुनिक भारतातील ग्रंथालयांच्या विकासात डॉ. रंगनाथन् ह्यांचा फार मोठा वाटा आहे. देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची कवाडं विनामूल्य खुली करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. रंगनाथन् ह्यांनीच रूजवला. नंतर तो जोपासण्यासाठीही आपले संपूर्ण आयुष्य झिजवले. डॉ. रंगनाथन् ह्यांनी मांडलेले पाच पुस्तकालयविज्ञान सिद्धांत हे भारतीय पुस्तकालयविज्ञानाचा पाया समजले जातात. डॉ. रंगनाथन् ह्यांचा वाढदिवस भारतात 'ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा केला जातो.









राष्ट्रीय ग्रंथपाल दिन या दिवसाचे अवचित्य साधून पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालयांमध्ये मोठया उत्साहाने त्यांची जयंती साजरी केली या जयंतीस कॉलेजच्या प्राचार्या डॉ. व्ही. एस. बॅकॉड मॅडम ग्रंथालयाचे सहाय्यक ग्रंथपाल श्री. एस. यु. खेडेकर सर व सर्व विभागाचे विभाग प्रमुख आणि ग्रंथालय कमिटी मधील सर्व सदस्य यांनी सक्रिय सहभाग घेतला या जयंतीला सर्व विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनी यांनी अतिशय मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला.



राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे नियोजन ग्रंथालय विभागातून श्री. सोमनाथ खेडेकर सर यांनी केले.